# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०१/२०२५ (शनिवार) सकाळ**


---

## मंगळसुत्र हिसकावुन नेणाऱ्या आरोपीचा २४ तासाच्या आत शोध घेवुन केली अटक
## देवलापार पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन देवलापार :– दिनांक २३/०१/२०२५ रोजी फिर्यादी नामे सौ माया परसराम सर्यम,वय ६२ वर्षे रा– गर्रा,पोस्ट मानेगाव टेक,ता रामटेक जि नागपुर ही मौजा गर्रा शेतशिवार येथे तिच्या गुरांना चरण्यासाठी घेंवुन जात असतांना एक अनोखळी इसम मोटर सायकल घेवुन त्यांच्या जवळ येवुन त्यांना “अर्जुनी की तरफ कौनसा रस्ता जाता है?” असे विचारू लागला तेव्हा फिर्यादीने आरोपीला बोट दाखवुन रस्ता दाखविला.त्यानंतर तो मोटर सायकल ने पुढे गेला. फिर्यादी ही शेताकडे जाण्यासाठी रस्त्यावरून वळली तेव्हा तो अनोळखी इसम त्याची मोटर सायकल उभी करून फिर्यादीकडे पायी चालत आला आणि फिर्यादीचे जुने वापरते मंगळसुत्र त्यामध्ये ५० सोन्याचे मणी ३ ग्रॅम, सोन्याचे पदक (डोरले) २ ग्रॅम किंमती अंदाजे २५,०००/– रूपये हिसकावुन तेथुन मोटर सायकलने पळुन गेला.अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम ३०४(२) भान्यासं प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा तपास देवलापार पोलीसांनी तात्काळ सुरू करून घटनास्थळी भेट दिली. तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदार यांच्या मदतीने देवलापार पोलीसांनी आरोपी नामे इसरान ऊर्फ इस्सु इस्राईल खान वय २५ वर्षे रा खवासा त कुरई जि सिवनी राज्य मध्यप्रदेश याला महाराष्ट्र मध्यप्रदेश सिमेवरून खवासा जि. सिवनी येथुन ताब्यात घेतले असुन आरोपीला दिनांक २४/०१/२०२५ रोजी अटक केली आहे. आरोपीच्या ताब्यातुन गुन्ह्यात वापरलेली दुचाकी टिव्हीएस स्पोर्ट क्रमांक एम पी २२ झे सी २२८४ किंमत ९०,००० /– रूपये, चोरीस गेलेल्या सोन्यापैकी पदक २ ग्रॅम आणि सोन्याचे मणी १ग्रॅम एकूण ३ ग्रॅम किंमती १५०००/– रूपये एकूण १,०५,००० /– रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त पुढील तपास देवलापार पोलीस करत आहेत.

# जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांना अटक
# १८ जनावरांना जीवनदान

पोलीस स्टेशन बेला. :– दिनांक २५/०१/२५ रोजी ०४:०० वाजेच्या सुमारास बेला पोलीस मौजा सिर्सी दुरक्षेत्र येथे पेट्रोलींग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पेट्रोलींग केली असता संशयीत १२ चक्का ट्रक कमांक एम.एच ३४ बी जी ६३०७ हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये २२ गोवंश जातीचे बैल अंत्यत कुरपणे, निदर्यतेने चारही पायाला ,तोंडाला दोरी बांधुन एकमेकांवर कोंबुन दिसले. तसेच ४ बैल मरण पावल्याचे ही दिसले. पंचासमक्ष सदर घटनास्थळा वरून १) १२ चक्का ट्रक क. एम.एच. ३४ बी.जी. ६३०७ किमंती ११,००,०००/–रु २) २२ गोवंश बैल जातीचे जनावरे किमंती ५,००,०००/–रु असा एकुण १६,००,०००/– रु चा मुद्देमाल जप्त केला आहे. १८ बैलांना सुरक्षीत रित्या गोशाळेत दाखल करण्यात आले आहे.

ट्रक कमांक एम.एच ३४ बी जी ६३०७ चा चालक आरोपी १) नामे शाहरूख रेहमत पठाण ,वय ३० वर्षे,रा नविन घरकुल वार्ड क. १४,मुर्तीजापुर,जि अकोला, आरोपी क्लिनर २) शेख इम्रान खान ख्वाजा, वय ३२ वर्षे,रा.नविन घरकुल वार्ड क. १४, मुर्तीजापुर, जि अकोला ,आरोपी मालक ३)इमराण कुरेशी, गडचांदुर जि चंद्रपुर यांचे विरूध्द पोलीस स्टेशन बेला येथे कलम ३२५, ३(५) भा.न्या.स. सहकलम ११(१), (घ) (क) (ज) (च) (झ) (ठ) (ड) प्राण्यांचा छळ प्रति. कायदा, सहकलम ०५ पशु. संरक्षण. अधि. सहकलम ५, ५ (आय), ५(ठ) गोवंश हत्याबंदी कायदा,सहकलम ११ मु.पो.का. सह कलम ६६(१), १९२(आय), ३/१८१ मोवाका, सहकलम ४९ भा.न्या.स. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क .१ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर